# विश्वकोश परिचय

दिनांक १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठी भाषेच्या विकासाची नवी दालने खुली झाली. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि ज्ञाननिर्मिती यांचा विकास करण्याकरिता जी अनेक पावले उचलली, त्यांतले ऐतिहासिक पाऊल म्हणजे दि. १९ नोव्हेंबर १९६० रोजी 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ' याची स्थापना. आधुनिक जग हे ज्ञान आणि माहिती यांचे जग म्हणून ओळखले जाते. यामध्ये ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानप्रसार या तीनही गोष्टींचा समावेश होतो. याचा विचार करून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अंतर्गत मराठी विश्वकोशाचा प्रकल्प हाती घेण्यात आला. मानव्यविद्या आणि विज्ञान व तंत्रज्ञान या दोन ज्ञानशाखांमध्ये जेवढे विषय असतील, त्या सर्वांची माहिती मराठी वाचकांना उपलब्ध करून द्यावी हे विश्वकोशाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

इंग्रजी भाषेतून प्रकाशित होणाऱ्या आणि जगातील विद्वज्ज्ञनांकडून मान्यता पावलेला *एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिका* याच्या धर्तीवर मराठी विश्वकोशाची निर्मिती स्वतंत्रपणे करावी असे ठरले. प्राज्ञपाठशाळेच्या माध्यमातून संस्कृतचे अध्ययन करणारे व धर्मकोशाची धुरा सांभाळणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावर ही जबाबदारी आली आणि मराठी विश्वकोशाचे कार्य सुरू झाले. या प्रकल्पासाठी आवश्यक संसाधनांची जुळवाजुळव तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केली. विश्वकोशाचे संपादकीय कार्यालय ज्या वास्तूत आहे, त्या वास्तूची पायाभरणी स्व. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या शुभहस्ते दि. ११ ऑक्टोबर १९५९ रोजी वाई, जि. सातारा येथे झाली.




मराठी विश्वकोशाच्या प्रत्यक्ष निर्मितीच्या पूर्वतयारीसाठी अध्यक्ष म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि सदस्य म्हणून श्री. गोवर्धन पारीख, श्री. गो. वा. बेडेकर, डॉ. ना. गो. कालेलकर, श्री. आ. रा. देशपांडे, प्रा. अनंत काणेकर, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. सरोजिनी बाबर यांसारख्या मातब्बर व्यक्ती कार्यरत होत्या. त्यांच्या सहकार्याने प्रारंभी मराठी विश्वकोशाचा आराखडा बनविण्यात आला. मराठी विश्वकोशाच्या समग्र

प्रकल्पाचे अंशतः दर्शन घडविण्यासाठी १९६५ मध्ये मराठी विश्वकोशाचा ‘परिचय ग्रंथ’ याचे प्रकाशन करण्यात आले.

मराठी विश्वकोशाची निर्मिती ही जागतिक पातळीशी समांतर असणाऱ्या कोशानुरूप करावयाची असल्याने त्या दर्जाचे जागतिक संदर्भमूल्य असणारे ग्रंथालय उभे करावयाचे होते. त्या दृष्टीने तर्कतीर्थांनी विशेष प्रयत्न केले आणि दर्जेदार संदर्भग्रंथांचे संकलन केलेल्या ग्रंथालयाची निर्मिती करण्यात आली.

एखाद्या प्रकल्पासाठी आवश्यक असणारी सर्व भौतिक आणि मानवी संसाधने उभी करणे हे कार्य परिश्रमानेच साध्य होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा लोकसंपर्क दांडगा होता आणि त्या काळात राष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या महान नेत्यांनाही त्यामुळे मराठी विश्वकोशाच्या आणि तर्कतीर्थांच्या एकूण कार्याबद्दल आस्था होती. त्यामुळे त्या काळातील लोकोत्तर भारतीय नेते आणि विद्वान मंडळी मराठी विश्वकोशाच्या कार्यालयास प्रत्यक्ष भेट देत असत. त्यांमध्ये प्रामुख्याने भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व सुधाकरराव नाईक यांचा समावेश होतो. या सर्व लोकांच्या सक्रिय प्रोत्साहनाने विश्वकोशाचे कार्य सुरू झाले.

मुद्रणाची व्यवस्था हा त्या काळातील महत्त्वाचा प्रश्न होता. ही सर्व व्यवस्था त्या काळी केवळ मुंबईलाच होत असे. वाईला संपादकीय व्यवस्थेबरोबर मुद्रणाची व्यवस्थाही उपलब्ध व्हावी यासाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पुढाकार घेऊन ९ एप्रिल १९७२ ला वाईत स्वतंत्र मुद्रणालयाची स्थापना केली. त्यासाठी त्यांनी शासनाच्या वतीने मराठी विश्वकोशासाठी वाईतील रास्ते वाडा खरेदी केला आणि या वाड्यात स्वतंत्र मुद्रणालय उभारले. मुद्रण आणि संपादन यांमध्ये सुयोग्य समन्वय होऊन विश्वकोशाच्या मुद्रण कार्याला गती मिळाली.

विश्वकोशाचे लेखनकार्य मराठीमधून करताना पारिभाषिक शब्दांच्या भरपूर अडचणी येत होत्या. पाश्चिमात्य देशांमध्ये निर्माण झालेल्या कोशांसाठी रूढ झालेली भाषा आणि परिभाषा उपलब्ध होती; तथापि तो-तो विषय समर्पक मराठी परिभाषेतच वाचकांसमोर जावा यासाठी मराठी विश्वकोशाने आधी ‘परिभाषा कोशा’ची निर्मिती केली. जागतिक

दर्जाच्या अनेकविध कोशांचा अभ्यास करून त्यांतील शब्दांसाठी मराठी शब्दांची घडण नव्याने करण्यात आली. १९७३ मध्ये या परिभाषा कोशाचे प्रकाशन करण्यात आले आणि बदलत्या भाषिक वातावरणासह या परिभाषा कोशाच्या आधारे मराठी विश्वकोशातील विविध विषयांवरील नोंदींचे लेखन सुरू झाले.


विश्वकोश हा एक पूर्ण प्रकल्प होता. त्याच्या आराखड्याप्रमाणे संहिता खंड, सूची खंड, परिभाषा कोश (खंड) आणि नकाशा खंड अशा सर्व खंडांचे लेखन आणि प्रकाशन एकत्रच करायचे होते. त्या दृष्टीने सर्व कार्य एकत्रित रीत्या सुरू होते; परंतु लेखन आणि मुद्रण पूर्ण झालेले खंड वाचकांसमोर लवकर यावेत या दृष्टीने भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांच्या हस्ते पहिल्या पाच खंडांचे प्रकाशन १९७६ मध्ये करण्यात आले. १९७७ मध्ये विश्वकोशाच्या सहाव्या आणि सातव्या खंडांचे तर १९७९ मध्ये आठव्या आणि १९८० मध्ये नवव्या खंडाचे प्रकाशन करण्यात आले. अशा रीतीने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे मराठी विश्वकोशाचे नऊ खंड व परिभाषा कोश यांची निर्मिती करण्यात आली.

पुढे विश्वकोशाच्या कामाची वाढती व्याप्ती लक्षात घेऊन दि. १ डिसेंबर १९८० रोजी साहित्य संस्कृती मंडळाचे विभाजन होऊन मराठी विश्वकोशाच्या संपादन आणि प्रकाशन कार्यार्थ ‘महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ’ याची स्वतंत्रपणे स्थापना करण्यात आली आणि आता विश्वकोशाचे पुढील सर्व कार्य या मंडळाकडून सुरू आहे.


तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या कारकीर्दीमध्ये १५ खंडांचे प्रकाशन झाले होते. त्यांचे मे १९९४ मध्ये निधन झाले. तर्कतीर्थांनंतर प्रा. मेघश्याम पुं. रेगे आणि प्रा. रावसाहेब ग. जाधव यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत विश्वकोशाच्या प्रकल्पाला आणखी गती मिळाली. जसजसा काळ पुढे सरकत होता, तसतसे नवे विषय आणि नव्या योजनाही मराठी विश्वकोशात अंतर्भूत होत होत्या.

प्रा. मे. पुं. रेगे यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत कुमार विश्वकोशाची रूपरेषा तयार करण्यात आली आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली कुमार विश्वकोशाचा परिचय ग्रंथ तयार

करण्यात आलेला होता; मात्र त्याचे प्रकाशन काही अपरिहार्य कारणामुळे त्यावेळी होऊ शकले नाही. पुढे १४ नोव्हेंबर २००३ मध्ये तत्कालीन अध्यक्ष डॉ. श्रीकांत जिचकार यांनी ‘कुमार विश्वकोश परिचय खंड’ याचे प्रकाशन नागपूर येथे भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या उपस्थितीत केले. जिचकार यांनी ‘विश्वकोश वार्षिकी २००५’ हा प्रकल्प हाती घेऊन त्याचे कार्य पूर्णत्वास नेले; पण त्यांच्या जून २००४ मध्ये झालेल्या अपघाती निधनामुळे त्यांच्या पश्चात वार्षिकीचे प्रकाशन मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाकडून २००४ मध्ये करण्यात आले. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही वार्षिकी अत्यंत उपयुक्त ठरली आहे.



डॉ. विजया वाड यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत विश्वकोशाचे पुढील १७ ते २० (उत्तरार्ध) या खंडाचे काम पूर्ण होऊन त्यांचे प्रकाशन करण्यात आले.




बदलते तंत्रज्ञान आणि त्याची सहजसुलभ उपलब्धता लक्षात घेऊन मराठी विश्वकोशाचे सर्व खंड वाचकांना महाजालावर बघता यावेत या दृष्टीने योजना आखण्यात आली. पुण्यातील प्रगत संगणक विकास केंद्र (CDAC) या केंद्र सरकारच्या संस्थेची मदत घेऊन सर्व खंडांचे पुनर्मुद्रण महाजालास योग्य अशा टंकामध्ये करण्यात आले. त्यानंतर मराठी विश्वकोशाचे सर्व खंड सहज शोधक्षम अशा प्रारूपात महाजालावर वाचकांसाठी लोकार्पित करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जगातील इतर विश्वकोशांच्या तुलनेत मराठी विश्वकोशाला आंतरराष्ट्रीय स्थान मिळवून तो महाजालावर आणण्याचा हा सर्वोत्तम प्रयत्न होता.


मराठी विश्वकोशाचा जो संकल्पित आराखडा होता, त्या आराखड्याप्रमाणे मराठी विश्वकोशाचे सर्व संहिता खंड १ ते २० उत्तरार्ध (अंक ते ज्ञेयवाद) प्रकाशित झाले आहेत. डॉ. विजया वाड यांच्या मार्गदर्शनाखाली कुमार विश्वकोशाच्या जीवसृष्टी आणि पर्यावरण या खंडाचा भाग - १ (२०११) व भाग - २ (२०१४) प्रकाशित करण्यात आला. तसेच कुमार विश्वकोशाच्या निवडक नोंदींचे ध्वनिमुद्रणही करण्यात आले. मराठी

विश्वकोश व कुमार विश्वकोश मंडळाच्या https://vishwakosh.marathi.gov.in/ व https://marathivishwakosh.org/ या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. अंध मुलांसाठी कुमार विश्वकोशाच्या जीवसृष्टी आणि पर्यावरण या खंडाच्या अंकुरण ते ग्लुकोज या पहिल्या भागाचे ब्रेल लिपीमध्ये रूपांतर करण्यात आले. डॉ. वाड यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वकोशाच्या अभिमान गीताची रचनाही करण्यात आली.


ऑगस्ट २०१५ मध्ये श्री. दिलीप करंबेळकर यांनी मंडळाच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. मराठी विश्वकोशाच्या २० खंडांचे लोकार्पण भ्रमणध्वनी उपयोजकाद्वारे (मोबाईल ॲप) दि. १२ जानेवारी २०१८ रोजी त्यांच्या हस्ते वाई येथे करण्यात आले. जगभरातील लोकांच्या हातात मराठी विश्वकोशाचे खंड देणे हे या उपयोजकामुळे शक्य झाले. तसेच त्यांच्या कारकीर्दीत सूचिखंड (२०१९) देखील प्रकाशित झालेला आहे.

मराठी विश्वकोशाचे अद्ययावतीकरण करण्याच्या दृष्टीने श्री. दिलीप करंबेळकर यांनी ज्ञानमंडळ ही संकल्पना पुढे आणली. यामध्ये विश्वकोशात प्रकाशित झालेल्या सर्व माहितीचे अद्ययावतीकरण करण्याची योजना आखण्यात आली. त्याप्रमाणे मानव्यविद्या आणि विज्ञान व तंत्रविद्या या दोन विद्याशाखांमधील वेगवेगळ्या विषयांची ४५ ज्ञानमंडळे स्थापन करून मराठी विश्वकोशाचे अद्ययावतीकरणाचे कार्य हाती घेण्यात आले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी १९६० च्या दशकात हा प्रकल्प उभा करताना अनेक लेखक, तज्ज्ञ, शास्त्रज्ञ आणि देशविदेशातील मार्गदर्शक यांचा पाठिंबा मिळवला होता. ज्ञानमंडळाची ही योजनाही व्यापक स्वरूप असणारी असल्याने तिला राज्यातील सर्वच तज्ज्ञ, शास्त्रज्ञ, लेखक, संशोधक आणि विविध विद्याशाखीय संस्था यांचा पाठिंबा आणि सक्रिय सहभाग मिळणे गरजेचे होते. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्रातील विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था यांना मराठी विश्वकोशाच्या या कार्यात सहभागी करून घेण्यात आले.


प्रा. श्री. म. (राजा) दीक्षित यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीमध्ये कुमार विश्वकोश जीवसृष्टी आणि पर्यावरण भाग – ३ व भाग – ४ या भागांचे ऑनलाइन अद्ययावतीकरण करण्यात आले तसेच या भागांची प्रकाशनपूर्व प्रत (पीओडी) तयार करण्यात आली.




भाग १ : अंकुरण ते ग्लुकोज



भाग २ : घटसर्प ते पॅरामिशियम



भाग ३ : पांगारा ते लाजाळू



भाग ४ : लिंबू ते ज्ञानेंद्रिये

विद्यमान अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या मार्गदर्शनाखाली नोंद प्रकाशनाचे कार्य पूर्वीप्रमाणेच ऑनलाइन स्वरूपात सुरू आहे. त्यांच्या कारकीर्दीत कुमार विश्वकोशाच्या पहिल्या खंडाच्या भाग – ३ व ४ यांचे ग्रंथ स्वरूपात प्रकाशन झाले. शिवाय विश्वकोशाच्या संहिता खंडाच्या द्वितीय मुद्रित आवृत्तीचे काम वेगाने सुरू आहे. २०२५ हे वर्ष मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे प्रथम अध्यक्ष स्व. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. त्यांच्याच हयातीत १ डिसेंबर १९८० ला महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळाची स्वतंत्रपणे निर्मिती झाली होती. हे स्मरण ठेवून डॉ. शोभणे यांच्या मार्गदर्शनाखाली २०२५ पासून १ डिसेंबर हा दिवस दरवर्षी विश्वकोश मंडळाचा वर्धापन दिन म्हणून साजरा करण्याची योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

## मराठी विश्वकोश व कुमार विश्वकोश यांतील नोंदींचा अकारविल्हे क्रम

मराठी विश्वकोश खंड १ ते २० तसेच कुमार विश्वकोश यांमधील नोंदींचा अकारविल्हे क्रम लावताना तो मराठी वर्णक्रमाप्रमाणे लावलेला आहे. तो वर्णक्रम पुढे दिलेला आहे. मराठी वर्णमालेत स्वरांचा क्रम व्यंजनांच्या आधी असतो; त्यामुळे स्वरांनी सुरू होणाऱ्या नोंदी व्यंजनांनी सुरू होणाऱ्या नोंदींच्या आधी क्रमाने येतील. शिवाय स्वर व व्यंजने यांच्यातही एक अंतर्गत क्रम असतो. उदा., **अ** नंतर **ॲ** नंतर **आ** इत्यादी; तसेच **क** नंतर **ख**, **च** नंतर **छ**, **ष** नंतर **स** इत्यादी.

मराठी वर्णमालेच्या या काहीशा दुहेरी क्रमव्यवस्थेनुसार तसेच नोंदीच्या शीर्षकातील सर्व शब्द एक सलग शब्द वा एकक मानून प्रस्तुत खंडांत नोंदींचा क्रम राखलेला आहे.

मराठीतील स्वरांचा व व्यंजनांचा क्रम विश्वकोशाने पुढीलप्रमाणे स्वीकारला आहे :

**स्वर :**

अ अॅ आ ऑ इ ई उ ऊ
ऋ ऌ ए ऐ ओ औ ं (अनुस्वार) ः (विसर्ग)

**व्यंजने :**

क ख ग घ ङ; च छ ज झ ञ;
ट ठ ड ढ ण; त थ द ध न;
प फ ब भ म; य र ल व;
श ष स ह ळ क्ष ज्ञ

ही क्रमव्यवस्था काही नोंदशीर्षकांच्या उदाहरणांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल; 'अंटार्क्टिका' व 'अक्कलकारा' या नोंदशीर्षकांमध्ये अ नंतर क हे व्यंजन येते. वास्तविक क नंतर ट असा व्यंजनांचा क्रम येतो; परंतु विश्वकोशातील वर्णक्रमात अनुस्वार व्यंजनापूर्वी येत असल्यामुळे 'अंटार्क्टिका' ही नोंद 'अक्कलकारा' या नोंदीपूर्वी येईल.

## मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षांची कालानुक्रमे कारकीर्द

| अध्यक्षांचे नाव | कालावधी | छायाचित्र |
|---|---|---|
| तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | १९ नोव्हेंबर १९६० ते २७ मे १९९४ |  |

| | | |
|---|---|---|
| प्रा. मेघश्याम पुंडलीक रेगे | ०४ जून १९९४ ते २८ डिसेंबर २००० |  |
| प्रा. रावसाहेब ग. जाधव | १६ जानेवारी २००१ ते १० फेब्रुवारी २००३ |  |
| डॉ. श्रीकांत जिचकार | २१ जुलै २००३ ते ०२ जून २००४ |  |
| डॉ. विजया वाड | ०९ डिसेंबर २००५ ते ०८ डिसेंबर २००८ व ०९ जून २००९ ते ३० जून २०१५ |  |

| | | |
|---|---|---|
| श्री. दिलीप करंबेळकर | १० ऑगस्ट २०१५ ते ३० जुलै २०२० |  |
| प्रा. श्री.म. (राजा) दीक्षित | २७ मे २०२१ ते २६ मे २०२४ |  |
| डॉ. रवींद्र शोभणे | २७ नोव्हेंबर २०२४ पासून कार्यरत |  |